Literacy for a Billion

Movie: Kichak Vadh
Year: 1959

Song: Sharnagat Kalyan Kari Tu
Lyricist: G. D. Madgulkar

आदिशक्ती
आदिमाये
तूच एक आधार
माऊली आले
शरण मी
तुजवर माझा भार

शरणागत कल्याण करी तू
शरणागत कल्याण माते
तूच करी कल्याण

शरणागत कल्याण करी तू
शरणागत कल्याण माते
तूच करी कल्याण

खेळ खेळले विरह राया
खेळ खेळले विरह राया
नीतीचा निःपात कराया
नीतीचा निःपात कराया

अबला हाय तयांची छाया
आज भिकारीण होऊनी आली
मागतसे हे दान माते
मागतसे हे दान माते

तूच करी कल्याण माते
तूच करी कल्याण

पतीव्रतेची जाण दशा ही

सिंहवाहिनी हो वरदायी
पूजू कशी साधन ही नाही
पूजू कशी साधन ही नाही
पदी वाहते अश्रू माझे
पदी वाहते अश्रू माझे
पूजे परी ते मान माते
पूजे परी ते मान माते

तूच करी कल्याण माते
तूच करी कल्याण

शरणागत कल्याण करी तू
शरणागत कल्याण माते
तूच करी कल्याण

लीनपदासी
मी वनवासी
दुःख पीडीता  दीनादासी
शरण जाऊ मी
अन्य कुणासी
शरण जाऊ मी
अन्य कुणासी
तुझ्याच हाती देवी आता
अबलेचा अभिमान माते
अबलेचा अभिमान माते

Literacy for a Billion

तूच करी कल्याण माते
तूच करी कल्याण
शरणागत कल्याण करी तू

शरणागत कल्याण माते
तूच करी कल्याण

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*